**नियमित दिवाणी मुकदमा क्र. १११ सन २०१७** (चंद्रकांत सोनवडेकर – वादी वि. सखाराम उर्फ तिळू उर्फ टिळू सोनवडेकर–प्रतिवादी ) **निशाणी ४३ खालील आदेश**

.....

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी सदरचा अर्ज त्यांनी प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र .१ चा उलटतपास न घेतल्यामुळे त्यांच्याविरुध्द 'उलटतपास नाही' असा झालेला आदेश रद्द करुन उलटतपास घेण्यास परवानगी मिळावी, यासाठी दाखल केला आहे.

०३. वादी यांच्या कथनानुसार सदरचा दावा , वादी यांनी प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास घेणेवर नेमणेत आला. परंतु वादीचे वकील अन्य न्यायालयात व्यस्त राहिल्याने व पुकारणीच्यावेळी न्यायालयात हजर न राहिल्याने प्रतिवादीतर्फे साक्षीदार नं. १ यांचा उलटतपास वादी यांना घेता आला नाही. त्यामुळे मे. न्यायालयाने वादीविरुध्द प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा 'उलटतपास नाही' असा आदेश केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र .१ यांचा उलटतपास घेण्यास जाणुन बुजुन टाळाटाळ केली नाही. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास न घेतलेस वादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे . त्यामुळे त्यांचेविरुध्द 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द होवून त्यांना प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ उलटतपास घेण्याची संधी मिळावी, अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की , अर्जातील कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र.१ हे सतत आजारी असुन देखील नियमित सुनावणीकरीता हजर राहतात. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे . तसेच अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च देण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आलेली आहे.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ श्री. सखाराम टिळू सोनवडेकर यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक २२/१२/२०२२ रोजी अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास दिनांक २१/०६/२०२३ रोजी घेण्यात आला आहे. सदर दिवशी वादीतर्फे वकीलांनी उलटतपास घेण्यास मुदत मागितली. त्यावेळी त्यांना मुदत देण्यात आली व सदर दाव्याची पुढील तारीख दिनांक ०८/०८/२०२३ रोजी नेमण्यात आली. परंतु दिनांक ०८/०८/२०२३ रोजी वादी व वादीतर्फे वकील गैरहजर असल्याने त्यांचेविरध्द 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत करणेत आला. सदरचा आदेश रद्द होण्यासाठी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०६. प्रस्तुत दाव्यात वादी यांना पुरेशी संधी देवून देखील वादीचा उलटतपास घेतलेला नाही. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द कब्जा व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षातील वाद गुणदोषावर निर्णित करण्यासाठी वादी यांना प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतु वादी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे दाव्यास विलंब झाला असून प्रतिवादी यांना नाहक त्रास देखील झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्याचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल, असे दिसून येते. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. वादी यांचा सदरचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये २०० /– (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देणेचे अटीवर वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

३. वादी यांनी पुढील तारखेस न चुकता खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना द्यावयाची आहे व प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र .१ चा उलटतपास घेण्याचा आहे. वादीने तसे न केल्यास सदरचा आदेश रद्द झाला , असे समजण्यात येईल.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2023.10.10 18:10:21 +0530

(अ. जो.बाचुळकर),
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ.

ठिकाण : कुडाळ.
दिनांक ०६/१०/२०२३